**नि. फौ. खटला क्र.५८/२०२०**

**निशाणी क्र.७२**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०५ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : माधव तातेराव घोगरे,

**वय** : ३५ वर्षे, **काम** : काही नाही,

**राहणार** : गुरधाळ, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयामध्ये गैरहजर आहेत. (अर्ज नि.६९ वरील आदेशाप्रमाणे आरोपींची गैरहजेरी माफ केलेली आहे.) दि.२४/०६/२०२० रोजी रात्री ९.०० वाजता बालाजी मिरकलेच्या घराजवळ गुरधाळ येथे घटना घडली. माझी पत्नी वर्षा नांदायला येत नव्हती. त्यामुळे माझा भाऊ मारोती बालाजीच्या घरी तिला बोलवायला गेले होते. त्यावेळी चर्चा सुरू असताना आरोपी क्र.१ ते ४ यांनी त्यास शिवीगाळ केली आणि मारहाण केली. माझे वडील मारोतीला सोडविण्यासाठी गेले असता आरोपी वर्षा व बालाजी यांनी त्यांना काठीने मारले. आरोपी क्र.२ व ३ हे खाली पडलेल्या मारोतीला मारत होते. त्यामुळे मारोती आणि वडील यांना सोडविण्यासाठी मी, एकनाथ दौलत घोगरे, दत्ता दौलत घोगरे गेलो होतो. आम्ही मारोतीला लातूर येथील दवाखान्यात नेले. मारोती तेथे तीन दिवस भरती होते. त्यानंतर मी आणि मारोती पोलीस ठाणे देवणी येथे गेलो होतो. मारोतीने तेथे घटनेबाबत खबर दिली. घटनेच्या वेळी आरोपी वर्षाने मारोतीच्या डोक्यावर कुऱ्हाडीने मारले होते. मी नमूद कुऱ्हाड आणि बोरीची काठी बघितल्यास ओळखू शकतो. आता मला मुद्देमाल क्र.३/२०२६ मधील बोरीची काठी **वस्तूचिन्ह अ** आणि कुऱ्हाड **वस्तूचिन्ह ब** दाखविले. हे तेच आहेत.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. भरत व्ही. पाटील यांच्यामार्फत ::**

०२. माझे शिक्षण दहावी पर्यंत झाले. मी भोईसर जि. पालघर येथे कंपनीमध्ये

वाहन चालक होतो. माझे लग्न दि.०४/०१/२०१६ रोजी झाले होते. माझे आणि वर्षाच्या पसंतीने लग्न झाले होते. लग्न झाल्यापासून तीन वर्ष माझ्या जवळ होती. त्या दरम्यान आम्हाला ०४/११/२०१६ रोजी मुलगी झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी मुंबई येथे राहत असताना मित्रांना खोलीवर घेऊन येत होतो आणि माझ्या पत्नीस त्यांना दारू आणि मटन करून दे असे सांगत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी वर्षासोबत शारिरीक संबंध केल्याबाबत चलचित्र आणि छायाचित्र काढले होते व तिने त्याकरिता विरोध केला होता. सकाळी लवकर न उठणे आणि टिफीन करून न देणे यावरून आमचे भांडण होत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या गैरवर्तणुकीमुळे आमचे पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी तिला मारहाण करून माहेरी पाठविले होते. हे म्हणणे खरे आहे की, वर्षा ही तिच्या वडिलांकडे राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील आणि वर्षाचे वडील यांनी आमच्यातील वाद सोडविण्यासाठी बैठका घेतल्या होत्या. हे बरोबर आहे की, वाद असल्यामुळे मारोती आणि माझे वडील यांनी चार लोकांना घेऊन बालाजीच्या घरी जायचे होते.

०३. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४/०६/२०२० रोजी आरोपींनी माझ्या भावाला आणि विडिलांना मारल्याचे आणि मी व ईतरांनी त्यांना सोडविल्याचे खोटे सांगितले. माझी मुलगी साक्षी माझ्यासोबत राहत नाही. ती वर्षासोबत राहते. हे म्हणणे खरे नाही की, मी, भाऊ, वडील व नातेवाईक यांनी वर्षा माझ्याकडे यावी याकरिता खोटी केस केली आणि मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि.३०/०७/२०२६.